# जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा

क्रमांक :सी/कार्या-२अ/आगाऊ ताबा/कावि-०४/२०१६
दिनांक : १८/०१/२०१६

वाचले :-
१) अतिरिक्त महानगर पालिका आयुक्त, (प्रकल्प), बृहन्मुंबई महानगर पालिका यांचे पत्र क्र.AMC/५०६५ दि. ०७/०१/२०१६
२) उप प्रमुख अभियंता (विकास नियोजन) -१ बृहन्मुंबई महानगर पालिका यांचे पत्र क्र.CHE/३१५०५/DPES दि. ०५/०१/२०१६
३) नगर भूमापन अधिकारी, मुलुंड यांचे पत्र क्र. न भू.अ.मुं./मुलुंड पूर्व/न.भू. क्र. १३१८/१३१९/२०१६ दि.५/०१/२०१६
४) उप प्रमुख अभियंता (विकास नियोजन) -१ बृहन्मुंबई महानगर पालिका यांचे पत्र क्र.CHE/३१५०९/DPES दि. ९/१०/२०१५ प्रमाणे आरक्षण अभिप्राय.
५) महसूल व वन विभागाचे परिपत्रक क्र. संकिर्ण/२००२/प्र.क्र.३६३/ज-१, दि.०३/०९/२००३
६) शासन, महसल व वन विभाग निर्णय क्र. जमीन-२०१५/प्र.क्र.४५/ज-१ दि.१ जून, २०१५
७) महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग - ४ब अधिसुचना क्र.जमिन-२०१५/प्र.क्र.५५/ज १, दि.३१/१२/२०१५
८) महाराष्ट्र जमिन महसूल (सरकारी जमिनीची विल्हेवाट करणे) नियम, १९७१ च्या नियम क्र. ५ व ६

आदेश:-

उपोदघातातील अ. क्र. १ व २ कडील पत्रान्वये बृहन्मुंबई महानगर पालिका यांनी मौजे. मुलुंड-पूर्व, तालुका- कुर्ला येथील न. भू. क्र. १३१८(पै.) व १३१९(पै.) ची जागा डंपींग ऑफ रिफ्युज सॉलीड वेस्ट ट्रीटमेंट प्लॅन्ट व त्याच्या संलग्न कार्यप्रणाली, बफर झोन, १३.४० मी. डी. पी. रोड कामी ४५ हेक्टर जागा हस्तांतरीत करणेत विनंती केली आहे.

उपोदघातातील अ. क्र.३ अन्वये सदर मिळकती संदर्भातील नगर भूमापन अधिकारी, मुलुंड यांचेकडील दि.५/१/२०१६ अन्वये प्राप्त चोकशी अहवाला प्रमाणे महानगर पालिकेने नियोजित प्रयोजनासाठी मागणी केलेल्या जमिनीपैकी मोजे-मुलुंड-पूर्व, स. नं. ३८८, न. भू. क्र. १३१८ चे मिळकत पत्रिकेनुसार एकूण क्षेत्र ३२७५६३७.२ चौ. मी. असून धारणाधिकार "ग-१" दाखल आहे व धारक सदरी भारत सरकार यांचे नांव दाखल आहे. सदर मिळकत केंद्र शासनाची असल्याने या कार्यालयाकडून सदर मिळकतीचा ताबा देण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

मोजे- मुलुंड-पूर्व, स. नं. ३८७, न. भू. क्र. १३१९ च्या मिळकत पत्रिकेप्रमाणे एकूण क्षेत्र १०६३६२७.१ चौ. मी. असून धारणाधिकार "ग" आहे. दि. ३/२/१९९९ च्या नोंदीने धारक सदरी महाराष्ट्र सरकार अशी नोंद दाखल केलेली आहे. सदर मिळकती पैकी १०९४१.४० चौ. मी. स्मशानभूमीसाठी व १९११.१० चौ. मी. क्षेत्र नियोजित रस्ता अशा एकूण १२८५२.५० चौ. मी. क्षेत्राचा ताबा बृहन्मुंबई महानगर पालिका यांचेकडे देण्यात आला असल्याची नोंद दि.१४/०१/२००० रोजी घेण्यात आलेली आहे. तसेच दि. २७/६/२००० च्या नोंदीने ६७०९५.०

जिल्हाधिकारी,मुंबई उपनगर यांचे कार्यालय, प्रशासकिय इमारत १० वा मजला,शासकिय वसाहत,बांद्रा (पूर्व)मुंबई ५१
कार्यालय ९१-२६५५६७९९/२६५५७८०७ फॅक्स २६५५६८०५ इमेल collectormsd@gmail.com

E:\desk II B\Mulund Dumping advance possession order doc

Scanned by CamScanner

पी. पी. क्षेत्र शहर व औद्योगिक विकास महामंडळ मर्यादीत (सिडको) यांचे नावे वगळून करण्यात आलेले आहे. दि. १४/८/२००८ चे नोटीसे या उच्च न्यायालय, मुंबई यांचेकडील W.P. No. ३२४५/०८ मधील दि. ६/१०/२००८ चे आदेशान्वये महाराष्ट्र शासन राजपत्र अधिसूचना क्र.म.शा./कक्ष ३/कवे/सी आर २२११/व.१ दि. ७/७/२००८ अन्वये कांदळवनाखाली येणाऱ्या ४५,४९९०.०० चौ. मी. क्षेत्रास संरक्षित वने (कांदळवन) अशी नोंद घेण्यात आलेली आहे. सदर क्षेत्राचा ताबा वनविभागास दि. २५/८/२००८ रोजी देण्यात आला आहे.

सदर न. भू. क्र. १३६८(पै) व १३६९(पै) जमिनीचे बृहन्मुंबई महानगर पालिका यांचेकडील आरक्षण अभिप्राय पत्र क्र. CHE/३९८०७/DP/ES दि. ४/१०/२०१५ प्रमाणे सदर जमिन म्युनिसिपल पार्क, एमईड स्लम्स, रिफ्यूज ट्रान्सफर स्टेशन, बेस्ट बस डेपो व बेस्ट बस स्टेशन, केमिकल पोलिस, कॉलेज, एमएमआरडी यार्ड, डंपर यार्ड, एमएसईबी सबस्टेशन व रिसिव्हींग स्टेशन असे एकत्रित आरक्षण दर्शविण्यात आलेले आहे. सदर क्षेत्र अंशत: वाणिज्य झोन (C१), अंशत: ना विकास क्षेत्र (NDZ) व अंशत: निवासी क्षेत्र (R) या मध्ये येते. महाराष्ट्र शासन राजपत्र U/s ३७(२) क्र.TPB/४३०८/२००८/CR-५३/०८/UD-११ दि. २८/०२/२००९ प्रमाणे नोंदवलेल्या नकाशातील कांजुर मार्ग डेपोकरीता केलेल्या फेरफाराप्रमाणे क्षेत्र डंपींग ऑफ रिफ्युज सॉलीड वेस्ट ट्रीटमेंट प्लॅन्ट व त्याच्या संलग्न कार्याकरिता, बफर झोन या आरक्षणाने बाधित असल्याचे नमूद करण्यात आल्याचे दि.४/१०/२०१५ च्या पत्रात स्पष्ट केले आहे.

उपोद्घातातील अनु.क्र. ५ अन्वये नगरपंचायत/ नगरपालिका/ महानगरपालिका यांना घनकचरा प्रक्रिया व विल्हेवाटीसाठी शासकीय जमिनीचा आगाऊ ताबा देणेकरिता जिल्हाधिकारी सक्षम आहेत.

उपोद्घातातील अनु. क्र. ५ मधील शासन, महसूल व वन विभाग, निर्णय क्र. जमीन-२०१५/प्र.क्र. ८०/ज-१ दि. १ जून, २०१५ नुसार बृहन्मुंबईसह राज्यातील सर्व महानगरपालिका क्षेत्रातील शासनमान्य विकास आराखड्यातील विविध सार्वजनिक सुविधा व सार्वजनिक प्रयोजनासाठी निर्देशित आरक्षणाखालील शासकीय जमीनीचा आगाऊ ताबा राज्य शासनाच्या संबंधित प्रशासकीय विभाग, संबंधित विकास प्राधिकरण/स्थानिक प्राधिकरण इत्यादींना देण्याचे अधिकार संबंधित जिल्ह्याचे जिल्हाधिकारी यांना देण्यात आले आहेत.

उपोद्घातातील अनु.क्र. ५ अन्वये महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ च्या तरतूदी अन्वये प्रसिध्द करणेत आलेल्या प्रारुप अथवा अंतिम विकास आराखड्यातील आरक्षण विनीयोजन करण्यासाठी शासकीय जमिन नियोजन प्राधिकरणास आवश्यक असेल, तर सदर शासकीय जमिनीत बाजारमूल्य कितीही असले तरी अशी जमिन संबंधित नियोजन प्राधिकरणास देण्यास जिल्हाधिकारी सक्षम आहेत.

महाराष्ट्र शासन राजपत्र U/s ३७(२) क्र.TPB/४३०८/२००८/CR-५३/०८/UD-११ दि.२८/०२/२००९ नुसार बृहन्मुंबई महानगर पालिकेने मागणी केलेल्या प्रयोजनासाठी नकाशात विनीयोजन केलेले क्षेत्र आरक्षित असल्याचे घोषित केले आहे.

सबब, बृहन्मुंबई महानगर पालिकेने मागणी केलेल्या मौजे-मुलुंड-पूर्व, न. भू. क्र. १३६९ मधील वरील प्रमाणे नमूद केलेले म.न.पा. व सिडको कडे वर्ग केलेले क्षेत्र तसेच महाराष्ट्र शासन राजपत्र अधिसूचना क्र.म.शा./क.३/कवे/सी.आर.२२११/व-१ दि.७/७/२००८ अन्वये अधिसूचित झालेले व वनविभागाच्या ताब्यात दिलेले कांदळवनाचे क्षेत्र असे मिळून एकूण क्षेत्र ५३४९३७.५ वगळता उर्वरीत क्षेत्रापैकी डंपींग ऑफ रिफ्यूज सॉलीड वेस्ट ट्रीटमेंट प्लॅन्ट व त्याच्या संलग्न कार्याकरिता, बफर झोन, १३.४० मी. डी. पी. रोड करीता आरक्षित



Scanned by CamScanner

(१२३)

असलेल्या क्षेत्रामध्ये कांदळवन बाधीत क्षेत्र वगळून या आदेशा सोबतच्या नकाशात नमूद A,B,C,D, E,F,G,H,I,J,K,L,M,N,O,P,Q,R,S,T,U,V,W,X,Y,Z, आणि Z1 या बिंदुनी दर्शविलेले क्षेत्र अंदाजे ३,२७,७२५.०० चौ. मी. नगर भूमापन अधिकारी, मुलुंड यांचेकडून मोजणी करुन घेऊन बृहन्मुंबई महानगरपालिकेकडे आगाऊ ताबा देण्यास उपोदघातातील अनु.क्र. ५,६,७ व ८ अन्वये मी, जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर याद्वारे खालील नमूद अटी/शर्तीवर मान्यता देत आहे.

**अटी/शर्ती:**

१) प्रस्तावित प्रकल्पासाठी आगाऊ ताबा देण्याची मान्यता म्हणजे जागा प्रदान नव्हे. जमीन शासनाच्या मालकीची राहील व अशा मान्यतेमुळे सदर जागेवर अंतिम आदेश होई पर्यंत बृहन्मुंबई महानगर पालिका यांचा कोणत्याही प्रकारे हक्क आणि हित संबंध निर्माण होणार नाहीत.

२) नियोजनाच्या दृष्टीकोनातून प्रस्तावित शासकिय जमीनीचा वापर अनुज्ञेय असल्याची खात्री बांधकाम करण्यापूर्वी संबंधित विभागाकडून करावी.

३) प्रस्तावित प्रयोजना व्यतिरिक्त शासकीय जमीनीचा वापर अन्य कोणत्याही प्रयोजनासाठी अनुज्ञेय रहाणार नाही.

४) सदर जमिन हस्तांतरणाबाबत शासन ठरविल त्या अटी/शर्ती महानगर पालिकेला मान्य असतील.

५) जमिनीचा आगाऊ ताबा दिल्यानंतर जमिनीचे अतिक्रमणापासून संरक्षण करणे महानगर पालिकेची जबाबदारी असेल.

६) जमिन हस्तांतरणाबाबत शासनाने सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे या जागेचे भोगवटामूल्य निश्चित करुन दिल्यास ते भोगवटामूल्य शासनास भरणे महानगरपालिकेस बंधनकारक राहील.

७) जागेवर बांधकाम, आरक्षण इ. असले तरी त्याबाबत नियमानुसार योग्यती कार्यवाही करण्याची जबाबदारी बृहन्मुंबई महानगर पालिका यांची राहील

८) प्रकरणातील जमिनीची मोजणी कामी नगर भूमापन अधिकारी, मुलुंड यांचेकडे अर्ज करावा व मोजणी करुन घ्यावी.

९) कांदळवनाच्या बाबतीत मा. उच्च न्यायालयाने रिट याचिका क्र.३२४६/२००४मध्ये दि.०६/१०/२००५ च्या आदेशाचे व यासंबंधी मा. उच्च न्यायालयाने या व इतर रिट याचिका मधील आदेशांचे पालन करणे महानगर पालिकेवर बंधनकारक असेल.

१०) या आदेशा सोबतचा नकाशा आदेशाचा भाग समजण्यात यावा.

११) उपोदघातातील सर्व नमूद शासन निर्णय, परिपत्रके, सरकारी जमिनीची विल्हेवाट लावणे नियम-१९७१ तसेच महाराष्ट्र जमिन महसूल अधिनियम मधील तरतूदी बृहन्मुंबई महानगर पालिकेवर बंधनकारक राहतील.

१२) या जागेचा वापर करण्यापूर्वी आवश्यक त्या सर्व प्राधिकरणांची परवानगी घेण्याची जबाबदारी बृहन्मुंबई महानगर पालिकेची असेल. याबाबतीत कोणताही भंग झाल्यास त्याकरिता शासन व हे कार्यालय जबाबदार असणार नाही.

१३) बृहन्मुंबई महानगर पालिका वरील अटी/शर्ती मान्य असल्याचे हमीपत्र सादर करेल.

सही/-
जिल्हाधिकारी
मुंबई उपनगर

प्रति,
अतिरिक्त महानगर पालिका आयुक्त, (प्रकल्प)
बृहन्मुंबई महानगर पालिका मुख्यालय,
फोर्ट, मुंबई- ४०० ००१



Scanned by CamScanner

प्रत:-

१) मा. प्रधान सचिव (महसूल) महसूल व वन विभाग.(ज-३) मंत्रालय, मुंबई ३२ यांना माहितीसाठी सविनय सादर.

२) मा. विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांनेकडे माहितीसाठी सविनय सादर.

३) प्रमुख अभियंता. (विकास नियोजन) -१, बृहन्मुंबई महानगर पालिका मुख्यालय, ५ वा मजला, फोर्ट, मुंबई

४) तहसिलदार, कुर्ला (मुलुंड)

५) नगर भूमापन अधिकारी, मुलुंड.

२/- प्रकरणी प्रश्नांकित जमिनीचा तहसिलदार कुर्ला व नगर भूमापन अधिकारी, मुलुंड यांनी संयुक्त रित्या बृहन्मुंबई महानगरपालिका यांना जमिनीचा आगाऊ ताबा देवून ताबा पावती व मोजणी नकाशा २ प्रतीत सादर करावा. तसेच मोजणीअंती प्रत्यक्ष क्षेत्र या कार्यालयास कळवावे, जेणेकरून जमीन प्रदानाचे आदेश निर्गमित करण्याबाबत पुढील कार्यवाही करता येईल.

COLLECTOR OF

MUMBAI SUBURBAN DISTRICT

स्वच्छ प्रतीवर मा.जिल्हाधिकारी यांची सही आहे

जिल्हाधिकारी

मुंबई उपनगर करिता

Received

18.1.2016.

Received 2 copies

19/01/2016



Scanned by CamScanner